महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
**CIN No.U40109MH2005SGC153646**
एच.व्हि.डी.सी. ग्र.कें. (संवसु) मंडळ चंद्रपूर
२९४५०५ ( का)
Email.id-se4300@mahatransco.in
अधिक्षक अभियंता
एचव्हिडीसी ग्र.कें.(संवसु) मंडळ,
सीटीपीएस कॉम्पलेक्स चंद्रपूर.

संदर्भ :अअ / एचव्हीडीसी / ग्र.के / संवसु / मंडळ / चंद्र / मासंवि / 000211 दिनांक : 09 FEB 2022

**शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२१-२०२२ करीता प्रतिक्षा यादीवर निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी कार्यान्वित करणेबाबत.**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री या व्यवसायातुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांकडुन (Online) अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज सादर करण्याची अंतिम दि. ०७.१०.२०२१ होती व स्वहस्ते / पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतिम दि. १८.१०.२०२१ होती..

२. प्रतिक्षा यादी वरील उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार करण्यात आली असून, उमेदवारांची निवड यादी त्यांना S.S.C. व ITI (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर तसेच त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये दर्शविलेल्या जात व इतर माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकुण गुण समान आहेत अश्या उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठ उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे.

४. प्रतिक्षा यादी वरील तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत गटात मोडत नसणे इ. बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व सादर करू न शकलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. प्रतिक्षा यादी वरील तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती असून, पूर्णतः उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होणेसाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारणा करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवाराची उमेदवारी / निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. प्रतिक्षा यादी वरील तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेला उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळून आल्यास अथवा कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असून देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास नव्याने प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येवून त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतीक्षा यादीतील उमेदवार सुध्दा कागदपत्र

पडताळणी अपात्र झाल्यास/कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असून देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास त्या खालील गुणवत्ताधारक उमेदवाराची स्वतंत्र निवड / प्रतीक्षा यादी लावण्याचे अधिकार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें. संवसू प्रविभाग, चंद्रपूर राखुन ठेवत आहे.

७. प्रतिक्षा यादी वरील तात्पुरत्या निवड यादी / प्रतीक्षा यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर राखुन ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्र व्यवहार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## Select List OBC Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Pragati Shankar Thakre | OBC | 81.96 | |

९. प्रतिक्षा यादी (WAIT LIST) मधील उमेदवारांनी दि. १५/०२/२०२२ पूर्वी खाली नमूद केलेल्या पत्यावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ या कार्यालयांनी वेळेत मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहावे. दि. १५/०२/२०२२ नंतर मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पत्ता :

अधिक्षक अभियंता
एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग
सि.टी.पी.एस. कॉम्पलेक्स,
निर्माण भवन मागे, उर्जानगर, चंद्रपूर-४४२४०४

(एन.व्ही. किरोलीकर)
**अधिक्षक अभियंता**
**एचव्हिडीसी ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर**

**दिनांक :** ०९/०२/२०२२